प्रेसनोट दिनांक ०७/०३/२०२४

## ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई विभागाकडून अपसंपदेचा गुन्हा दाखल केलेबाबत

| | | |
|---|---|---|
| लाचलुचप्रत प्रतिबधंक विभाग/घटक | :- | ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई |
| पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर व कलम | :- | ए.पी.एम.सी. पो.स्टे. ठाणे गुन्हा रजि. नंबर ७३/२०२४<br>भ्र.प्र.अधि. सन १९८८ (संशोधन सन २०१८) कलम १३(१)(ब)सह १३(२) व कलम १२ अन्वये |
| गुन्हा दाखल दिनांक/वेळ | :- | दि. ०७/०३/२०२४ रोजी १८:४४ वाजता |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | :- | १) श्रीमती मिनल कृष्णा दळवी, वय ४९ वर्षे, तत्कालीन तहसिलदार (सध्या निलंबित), तहसिल कार्यालय, अलिबाग, जि. रायगड<br>२) श्री. कृष्णा वसंत दळवी वय ५५ वर्षे (खाजगी इसम) |
| अपसंपदेची रक्कम | :- | रू. २,२२,९४,१३८/- |
| थोडक्यात हकिकत | :- | लोकसेविका मिनल कृष्णा दळवी, तहसिलदार, अलिबाग जि. रायगड यांचेविरुध्द दि. १२/११/२०२२ रोजी अलिबाग पोलीस स्टेशन जि. रायगड गुन्हा रजि नंबर ३२७/२०२२ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम (संशोधन सन २०१८) चे कलम ७, ७(अ) अन्वये दाखल गुन्हयाचे अनुषंगाने त्यांचे मालमत्तेची उघड चौकशी करण्याचे आदेश प्राप्त झाले होते.<br><br>मालमत्तेच्या उघड चौकशी दरम्यान लोकसेविका श्रीमती मिनल कृष्णा दळवी, तहसिलदार ( सध्या निलंबित ) यांनी त्यांचे सेवाकालावधी व परिक्षण कालावधी दरम्यान भ्रष्ट व गैरमार्गाने, कायदेशिर ज्ञात उत्पन्नापेक्षा अधिक किंमतीची अशी रू. २,६२,०४,५९५/- इतक्या रक्कमेची मालमत्ता संपादित केली असून त्याची टक्केवारी ९८.९७ टक्के असल्याचे निष्पन्न झाले आहे.<br><br>तसेच लोकसेविका श्रीमती मिनल कृष्णा दळवी व त्यांचे पती श्री. कृष्णा वसंत दळवी यांनी परिक्षण कालावधीमध्ये मिळालेल्या एकूण ज्ञात उत्पन्नापेक्षा एकत्रित रू. २,२२,९४,१३८/- इतक्या रक्कमेची मालमत्ता संपादित केली असून त्याची टक्केवारी ८४.२० टक्के इतकी आहे. श्री. कृष्णा वसंत दळवी यांनी वरील प्रमाणे नमुद संपत्तीमधील मालमत्ता स्वत:च्या नावे बाळगून लोकसेविका श्रीमती मिनल कृष्णा दळवी यांना हेतुपुरस्सर व बेकायदेशिरपणे अपसंपदा मिळविणेसाठी प्रोत्साहन दिले म्हणून एपीएमसी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

**मार्गदर्शन अधिकारी :- मा.श्री. सुनिल लोखंडे पोलीस अधीक्षक, एसीबी ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

संपर्कपत्ता :- **ला.प्र.वि. ठाणे, मध्यवर्तीकारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१**
**ला.प्र.वि.नवी मुंबई मध्यवर्ती सुविधा इमारत ५०५, सेक्टर १९ तुर्भे एपीएमसी फळ मार्केट**

संकेतस्थळ :- acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई-मेल :- spacbthane@mahapolice.gov.in
ऑनलाईनतक्रार
ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net
टोलफ्रीनं. :- १०६४
दुरध्वनी क्र. :- ०२२-२०८१३५९८/२०८१३५९९/२७८३३३४४
व्हॉटस्ॲप क्र. :- ९९३०९९७७००

**(शिवराज म्हेत्रे)**
**पोलीस उप अधीक्षक,**
**ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई**

Scanned with CamScanner